**L. A. BILL. No. LXIV OF 2026.**

A BILL

TO RE-CONSTITUTE THE PUBLIC TRUST REGISTERED UNDER THE NAME “BHOSALA DEVASTHAN, RAMTEK”, SITUATED AT RAMTEK, DISTRICT NAGPUR, UNDER THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT AND TO PROVIDE FOR, THE BETTER ADMINISTRATION AND MANAGEMENT OF SHREE RAM MANDIR DEVASTHAN, RAMTEK, THE PROTECTION AND MANAGEMENT OF ITS PROPERTIES AND AFFAIRS UNDER THE SUPERVISION OF THE STATE GOVERNMENT, THE PRESERVATION OF ITS RELIGIOUS TRADITIONS, THE PROVISION OF BETTER FACILITIES FOR DEVOTEES, AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये रामटेक, जिल्हा नागपूर येथे स्थित असलेली “भोसला देवस्थान, रामटेक” या नावाने नोंदणी केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था**

**पुनर्घटित करण्याकरिता आणि श्री राम मंदिर देवस्थान, रामटेक याचे उत्तम प्रशासन व व्यवस्थापन करणे, राज्य शासनाच्या देखरेखीखाली त्याच्या मालमत्तेचे व कामकाजाचे संरक्षण व व्यवस्थापन करणे, त्याच्या धार्मिक परंपरांचे जतन करणे, भक्तगणांना अधिक उत्तम सुविधा पुरविणे यांकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये रामटेक, जिल्हा नागपूर येथे स्थित असलेली "भोसला देवस्थान, रामटेक" या नावाने नोंदणी केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरिता आणि श्री राम मंदिर देवस्थान, रामटेक याचे उत्तम प्रशासन व व्यवस्थापन करणे, राज्य शासनाच्या देखरेखीखाली त्याच्या मालमत्तेचे व कामकाजाचे संरक्षण व व्यवस्थापन करणे, त्याच्या धार्मिक परंपरांचे जतन करणे, भक्तगणांना अधिक उत्तम सुविधा पुरविणे यांकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता नवीन कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे. **त्याअर्थी,** आता, भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :- १९५० चा २९.

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, श्री राममंदिर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (रामटेक) अधिनियम, २०२६ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) "नियत दिनांक" याचा अर्थ, कलम १ च्या पोट-कलम (२) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला दिनांक, असा आहे;

(ख) "समिती" किंवा "व्यवस्थापन समिती" याचा अर्थ, कलम ५ अन्वये घटित केलेली व्यवस्थापन समिती, असा आहे;

(ग) "देवस्थान" याचा अर्थ, रामटेक, नागपूर येथील श्री राम देवस्थान, असा आहे;

(घ) "देवस्थान विश्वस्तव्यवस्था" किंवा "विश्वस्तव्यवस्था" याचा अर्थ, या अधिनियमान्वये पुनर्घटित केलेल्या श्री राममंदिर देवस्थान, विश्वस्तव्यवस्था (रामटेक) या बाबतीतील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, असा आहे;

(ङ) "पूर्वीची विश्वस्तव्यवस्था" याचा अर्थ, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये नोंदणी केलेली कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली ए-५३२ (एन) नोंदणी क्रमांक असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, असा आहे;

(च) "कार्यकारी अधिकारी" याचा अर्थ, कलम १८ अन्वये नियुक्त केलेला समितीचा कार्यकारी अधिकारी, असा आहे;

(छ) "व्यवस्थापन निधी" याचा अर्थ, कलम २७ अन्वये घटित केलेला व्यवस्थापन निधी, असा आहे ;

(ज) "सदस्य" याचा अर्थ, समितीचा सदस्य, असा आहे, आणि त्यामध्ये, समितीचा कोणताही पदाधिकारी, मग तो अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कोषाध्यक्ष किंवा इतर कोणत्याही पदनामाने संबोधण्यात येवो, यांचा समावेश होतो;

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित

केलेले, असा आहे ;

१९५० चा २९. (ञ) “सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम” याचा अर्थ, त्यावेळी अंमलात असलेल्या विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधातील महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम किंवा इतर कोणताही कायदा असा आहे;

(ट) “विश्वस्तव्यवस्था निधी” याचा अर्थ, कलम २५ अन्वये घटित करण्यात आलेल्या देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा निधी, असा आहे;

(ठ) “विनियम” याचा अर्थ, कलम ४७ अन्वये समितीने केलेले विनियम, असा आहे;

(ड) “नियम” याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे;

(ढ) “मंदिर” याचा अर्थ, रामटेक, तालुका रामटेक, जिल्हा नागपूर येथील श्री राम मंदिर, असा आहे ;

(ण) “वर्ष” याचा अर्थ, वित्तीय वर्ष, असा आहे;

(त) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

प्रकरण दोन

## पूर्वीची विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करणे आणि तिच्या मालमत्तेचे हस्तांतरण

**३.** (१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, रामटेक, तालुका रामटेक, जिल्हा नागपूर येथील भोसला देवस्थान, रामटेक या नावाने नोंदणी केलेल्या व ए-५३२ (एन) असा क्रमांक असलेल्या पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, या अधिनियमाच्या तरतुदी, नियत दिनांकास व तेव्हापासून लागू होतील आणि उक्त विश्वस्तव्यवस्था या अधिनियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे श्री राम मंदीर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (रामटेक) या नावाने पुनर्घटित करण्यात येईल. विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करणे आणि तिच्याकडे मालमत्ता हस्तांतरित करणे व त्या निहित करणे.

(२) नियत दिनांकास, पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची सर्व मालमत्ता-मग ती स्थावर असो किंवा जंगम, (सर्व मत्ता, हक्क, निधी, दायित्वे आणि आबंधने यांसह) या अधिनियमान्वये, आणि त्याच्या तरतुदींनुसार, पोट-कलम (१) अन्वये अशा पुनर्घटित केलेल्या देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी व्यवस्थापन समितीकडे हस्तांतरित व निहित होईल आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिकाऱ्यास त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल.

(३) नियत दिनांकाच्या लगतपूर्वी, पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात कार्य करणारी समिती किंवा विश्वस्त मंडळ काम करणे बंद करील आणि पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधातील तिचे सर्व अधिकार, कर्तव्ये, हक्क आणि विशेषाधिकार, कोणतेही असल्यास, देवस्थान विश्वव्यवस्थेच्या व्यवस्थापन समितीकडे निहित होतील.

**४.** (१) पुढील मालमत्तेचा, वस्तूंचा व पैशांचा ताबा असणारे पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेचे विश्वस्त मंडळ आणि इतर प्रत्येक व्यक्ती,— मौल्यवान वस्तूंचा व मालमत्तेचा ताबा विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरित करणे.

(क) पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता ; किंवा

(ख) पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या मौल्यवान वस्तू, आणि बँक किंवा पतसंस्था यातील ठेवींच्या स्वरूपात असलेला पैसा किंवा कोणत्याही व्यक्तीपाशी असलेला पैसा किंवा शेअर्समधील गुंतवणुकीच्या स्वरूपात असलेला पैसा यांसह सर्व पैसा,

यांचा ताबा, त्यांच्या संपूर्ण वस्तूसूचीसह, ताबडतोब किंवा व्यवस्थापन समितीकडून परवानगी देण्यात येईल अशा, तीस दिवसांहून अधिक नसलेल्या कालावधीच्या आत व्यवस्थापन समितीच्या

वतीने कार्यकारी अधिकाऱ्याकडे सुपूर्द करील किंवा त्या हस्तांतरित करील किंवा हस्तांतरित करण्याची व्यवस्था करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही मालमत्ता सुपूर्द किंवा हस्तांतरित करण्यात आली असेल त्याबाबतीत, कार्यकारी अधिकारी, त्या वस्तुसूचीची यथोचित पडताळणी केल्यानंतर, हस्तांतरकाला त्याबद्दलची योग्य ती लेखी पावती देईल, आणि त्यानंतर, कार्यकारी अधिकारी हा, अशा मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी जबाबदार असेल.

(३) पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची अशी कोणतीही मालमत्ता कार्यकारी अधिकाऱ्याकडे अशाप्रकारे सुपूर्द किंवा हस्तांतरित केल्यावर आणि पोट-कलम (२) अन्वये, त्याबद्दलची पावती मिळाल्यावर, हस्तांतरक, त्या मालमत्तेसंबंधातील सर्व दावे आणि मागण्या किंवा दायित्व यांपासून मुक्त व कार्यमुक्त होईल.

(४) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेने धारण केलेली स्थावर मालमत्ता, जाहीर लिलावाशिवाय आणि शासनाच्या विधि व न्याय विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय विकण्यात येणार नाही आणि परवानगी देतेवेळी, शासन, अशा स्थावर मालमत्तेची प्रतितोलित किंमत ही, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे खरे बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ अन्वये किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये निश्चित केलेल्या वार्षिक दर विवरणपत्रानुसार निश्चित केलेल्या दरानुसार अशा मालमत्तेच्या बाजारमूल्याहून कमी असणार नाही याची सुनिश्चिती करील :

परंतु, जाहीर लिलावाच्या वेळी त्या स्थावर मालमत्तेमध्ये जिचे हितसंबंध गुंतलेले असतील अशा व्यक्तीस, अशा लिलावाच्या वेळी स्वीकारलेल्या ह्या उच्चतम बोली किंमतीने उक्त स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा पहिला हक्क असेल.

(५) या कलमामध्ये नमूद केलेली कार्यपद्धती अनुसरल्याशिवाय, विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता अन्यसंक्रमित करणारा कोणताही संलेख वैध असणार नाही.

## प्रकरण तीन

## **व्यवस्थापन समिती**

देवस्थान विश्वस्तव्यवस्थेसाठी व्यवस्थापन समिती घटित करणे.

**५.** (१) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन करण्याच्या प्रयोजनांसाठी, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाकडून "श्री राममंदिर देवस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती" या नावाने संबोधली जाणारी एक समिती घटित करील.

(२) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) अन्वये अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि इतर आठ सदस्यांहून अधिक नसतील इतके इतर सदस्य यांचे मिळून बनलेली एक समिती घटित करील :

परंतु, समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी, दोनपेक्षा कमी नसतील इतके महिला सदस्य, असतीलः

परंतु आणखी असे की, समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी, एक सदस्य, देवस्थानाशी संबंधित असलेल्या भोसले कुटुंबातील एक व्यक्ती असेलः

परंतु तसेच, रामटेक विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारा महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य आणि रामटेक नगरपरिषदेचा अध्यक्ष, समितीचे पदसिद्ध सदस्य असतीलः

परंतु तसेच, पदसिद्ध सदस्य, जोपर्यंत ते त्यांचे संबंधित पद धारण करत असतील, तोपर्यंत, समितीचे पद धारण करण्याचे चालू ठेवतील आणि असे पद त्यागल्यावर, त्यांचे समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(३) या अधिनियमाच्या इतर तरतुदींस अधीन राहून, समिती ही, उपरोक्त नावाने ओळखला जाणारा

एक निगम निकाय असेल आणि तिची अखंड परंपरा असेल आणि एक सामाईक मुद्रा असेल आणि तिला स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल, आणि तिच्या उक्त नावाने तिला किंवा तिच्यावर दावा करता येईल.

(४) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर आणि पोट-कलम (१) अन्वये समिती घटित करण्यात येईपर्यंत, राज्य शासनास, समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत या अधिनियमांन्वये देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, प्रशासकाची नियुक्ती करता येईल.

**सदस्यांना भत्ते देणे.**

**६.** (१) प्रत्येक सदस्याला, समितीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी किंवा अध्यक्षाच्या किंवा सदस्याच्या कर्तव्यांशी संबंधित कोणतेही कामकाज चालविण्यासाठी, विहित करण्यात येईल असे पारिश्रमिक, आणि ज्या ठिकाणी अशा सभा आयोजित केलेल्या असतील किंवा कामकाज चालविले जाईल अशा ठिकाणापर्यंत जाण्याच्या आणि तेथून परतीच्या प्रवासासाठी, विहित करण्यात येईल असा प्रवासभत्ता आणि दैनिक भत्ता व्यवस्थापन निधीतून देण्यात येईल.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य विधानमंडळाचा जो कोणताही सदस्य, समितीचे सदस्यपद धारण करीत असतानाच्या कालावधीत पोट-कलम (१) खालील कोणताही भत्ता किंवा पारिश्रमिक मिळण्यास पात्र असेल अशा कोणत्याही सदस्याला, राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून चालू राहण्यास निरर्ह ठरविले जाणार नाही.

**सदस्यांचा पदावधी.**

**७.** (१) अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य यांची नेमणूक ही, तीन वर्षांच्या कालावधीसाठी असेल.

(२) कोणत्याही सदस्यास, आपल्या सहीने राज्य शासनाला उद्देशून समितीच्या आपल्या सदस्यत्वाचा लेखी राजीनामा देता येईल आणि त्याची एक प्रत अध्यक्षाला अग्रेषित करता येईल :

परंतु, असा राजीनामा हा राज्य शासनाकडून तो स्वीकारण्यात येईतोपर्यंत अंमलात येणार नाही.

(३) जर एखादा सदस्य, समितीची परवानगी न घेता, समितीच्या लागोपाठच्या तीन सभांना अनुपस्थित राहिला तर, तिसरी सभा यथोचितरीत्या समाप्त झाल्याच्या वेळेपासून, तो त्या समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल.

**सदस्य होण्याची अर्हता.**

**८.** (१) समितीचा सदस्य म्हणून नियुक्त केली जाणारी प्रत्येक व्यक्ती, -

(क) महाराष्ट्र राज्यातील कायमची रहिवासी असेल; आणि

(ख) ती, रामटेक येथील श्री राम यांची भक्त असेल आणि ती आपल्या नियुक्तीपूर्वी, सदस्य म्हणून विहित नमुन्यामध्ये तसे प्रतिज्ञापत्र करून देईल.

(२) अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि इतर सदस्य यांना अन्यथा अनर्ह ठरविले नसेल तर, ते पुनर्नियुक्तीसाठी पात्र असतील.

**सदस्यत्वाची अनर्हता.**

**९.** जर एखादी व्यक्ती,—

(क) कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये अनर्ह नसेल;

(ख) अज्ञान असेल;

(ग) विकल मनाची असेल आणि एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल;

(घ) अविमुक्त नादार असेल;

(ङ) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेसंबंधीच्या किंवा देवस्थान

विश्वस्तव्यवस्थेच्या वैधरीत्या धारण केलेल्या मत्तेशी संबंधित अशा कोणत्याही भाडेपट्टयात किंवा इतर कोणत्याही व्यवहारात तिचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हितसंबंध असेल;

(च) समितीची पगारी नोकर असेल किंवा देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात या समितीला वस्तू पुरविण्यासंबंधीच्या किंवा समितीने हाती घेतलेले कोणतेही काम पार पाडण्यासंबंधीच्या किंवा कोणतीही सेवा देण्यासंबंधीच्या कोणत्याही संविदेत तिचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल;

(छ) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाकरिता फौजदारी न्यायालयाने तिला दोषी ठरविलेले असेल;

(ज) समितीकडून अनुपस्थितीची रजा न घेता, अनुपस्थित राहिली असेल, म्हणजे, -

(एक) समितीच्या सलग तीन सभेसाठी अनुपस्थित राहिली असेल;

(दोन) सलग सहा महिन्यांच्या कालावधीकरिता भारताबाहेर गेली असेल;

(झ) समितीच्या सदस्याचे पद धारण केल्यावर तिने आपले कर्तव्य पार पाडताना गंभीर गैरवर्तणूक केल्याबाबत ती दोषी असल्याचे आढळून आली असेल किंवा भ्रष्टाचाराबद्दल दोषी असेल किंवा तिने कोणतीही लज्जास्पद वर्तणूक केली असेल;

(ञ) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये कलम ४१-ड किंवा इतर कोणत्याही तरतुदींन्वये धर्मादाय आयुक्ताने किंवा न्यायालयाने, कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त म्हणून तिला निलंबित केले असेल किंवा काढून टाकले असेल किंवा बडतर्फ केले असेल;

(ट) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेसाठी किंवा विश्वस्तव्यवस्थेविरुद्ध विधि व्यवसायी म्हणून व्यवसाय करीत असेल;

(ठ) परदेशात राहण्याच्या प्रयोजनाकरिता ती भारताबाहेर गेली असेल,-

तर ती सदस्य म्हणून नेमली जाण्यास अनर्ह असेल.

सदस्यांना पदावरून दूर करणे.

**१०.** (१) राज्य शासनास, समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष किंवा इतर कोणताही सदस्य यांना, खालील कोणत्याही कारणांवरून, म्हणजे,—

(क) त्याने कलम ९ मध्ये नमूद केलेली कोणतीही निरर्हता ओढवून घेतली असेल;

(ख) राज्य शासनाच्या मते, अशा व्यक्तीच्या कामगिरीचा दर्जा समाधानकारकरीत्या असल्याचे आढळून आले नसेल किंवा तो, कामगिरीच्या अपेक्षित दर्जाइतका नसेल,-

तर तिच्या पदावरून दूर करता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीला, या कलमान्वये तिला पदावरून दूर करण्याच्या बाबतीत लेखी स्वरूपात, कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(३) याबाबतीत राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

समिती पुनर्घटित करण्याचा अधिकार.

११. या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष किंवा त्या वेळी पद धारण करणारे सर्व किंवा इतर कोणतेही सदस्य यांच्या पदाची मुदत कमी करता येईल आणि राज्य शासनास योग्य वाटेल त्याप्रमाणे, एकतर उर्वरित मुदतीकरिता किंवा तीन वर्षांच्या पूर्ण मुदतीकरिता नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि इतर सदस्य यांची नियुक्ती करता येईल.

१२. मृत्यू, राजीनामा, निरर्हता किंवा सदस्याला पदावरून दूर करणे यांमुळे किंवा सदस्याने पदाचा अस्वीकार केल्यामुळे किंवा जेथे नियुक्ती रद्द केली असेल तेथे, किंवा पदाच्या मुदतीच्या समाप्तीपूर्वी कृती करण्यास सदस्य असमर्थ ठरल्यामुळे किंवा कार्यमुक्त किंवा मुक्त होण्यासाठी इच्छुक असल्यामुळे किंवा कृती करण्यास नकार दिल्यामुळे किंवा असा सदस्य म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्यास हयगय केल्यामुळे कोणतेही पद रिक्त झाल्यास, अशावेळी कार्यकारी अधिकारी व्यवस्थापन समितीमार्फत राज्य शासनाला तात्काळ कळवील; आणि त्या रिक्त पदावर एखाद्या व्यक्तीची नियुक्ती करून ते पद सोयीप्रमाणे, होईल तितक्या लवकर भरण्यात येईल आणि अशाप्रकारे नियुक्त केलेला सदस्य हा, ज्याच्या जागी त्याची सदस्य म्हणून नियुक्ती झाली असेल त्या सदस्याने जेथपर्यंत पद धारण केले असेल तेथपर्यंत, जर ते पद रिक्त झाले नाही तर, पद धारण करील.

नैमित्तिक रिक्त पदे भरणे.

प्रकरण चार

## कामकाज चालवणे

**१३.** (१) व्यवस्थापन समिती, आपले कामकाज चालवण्यासाठी, वेळोवेळी, स्वतः ठरवील अशा कालांतराने, सभा भरवील, तथापि, दोन सभांमधील कालावधी हा तीस दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.

समितीची सभा आणि कार्यपद्धतीचे नियम.

(२) समितीची निम्म्या सदस्य संख्येने गणपूर्ती होईल :

परंतु, जेव्हा गणपूर्ती आवश्यक असेल मात्र गणपूर्ती होण्याइतके सदस्य उपस्थित नसतील, तेव्हा पीठासीन प्राधिकारी ती सभा तीस मिनिटांसाठी स्थगित करील आणि मूळ सभेची गणपूर्ती झाली असती तर तिच्यापुढे जे कामकाज चालविण्यात आले असते ते कामकाज तहकुबीनंतर पुन्हा सुरू झालेल्या सभेपुढे चालविण्यात येईल-मग तिची गणपूर्ती झालेली असो किंवा नसो.

(३) समितीच्या प्रत्येक सभेच्या अध्यक्षपदी, समितीचा अध्यक्ष व त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष आणि त्यांच्या अनुपस्थित उपस्थित असलेल्या सदस्यांनी त्या प्रयोजनासाठी निवडलेला सदस्य असेल.

(४) समितीच्या सभेत उपस्थित होणाऱ्या सर्व प्रश्नांचा, उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय करण्यात येईल. समसमान मते पडतील त्याबाबतीत, अध्यक्षास किंवा, यथास्थिति, अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तीस, निर्णायक मत वापरण्याचा हक्क असेल :

परंतु, सभेच्या अध्यक्षास, सदस्य म्हणून पहिले मत देण्याचा आणि त्यानंतर अध्यक्ष म्हणून दुसरे मत देण्याचा अधिकार असेल;

(५) कार्यकारी अधिकारी, हा समितीचा पदसिद्ध सचिव असल्याने, प्रत्येक सभेच्या कामकाजाची कार्यवृत्ते ठेवण्यासाठी जबाबदार असेल आणि अशी कार्यवृत्ते अध्यक्षाकडून किंवा, यथास्थिति, सभेच्या अध्यक्षपदी असलेल्या सदस्याकडून यथोचितरीत्या प्रतिस्वाक्षरित करण्यात येतील.

(६) समिती, तिच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी व तिचे कामकाज चालवण्यासाठी राज्य शासनाच्या मान्यतेने, या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत विनियम करील.

दोष किंवा जागा रिक्त राहणे यामुळे समितीची कृती विधिअग्राह्य न ठरणे.

**१४.** समितीची किंवा समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची कोणतीही कृती किंवा कामकाज हे, समितीच्या सदस्यांमध्ये एखादी जागा रिक्त आहे किंवा तिच्या रचनेत दोष आहे किंवा समितीच्या अध्यक्षास किंवा कोणत्याही सदस्यास मत देण्यास किंवा कोणत्याही निरर्हतेमुळे किंवा त्याच्या नेमणुकीतील कोणत्याही नियमबाह्यतेमुळे, किंवा बेकायदेशीरपणामुळे अध्यक्ष म्हणून किंवा सदस्य म्हणून अधिकारपदावर चालू राहण्यास हक्कदार नव्हता याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य असल्याचे समजण्यात येणार नाही.

समितीची कर्तव्ये व अधिकार.

**१५.** (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(क) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कारभाराची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे ;

(ख) देवस्थानामध्ये रूढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजाअर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे ;

(ग) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा पुरविणे;

(घ) जी उद्दिष्टे व प्रयोजने यासाठी देवस्थान विश्वस्तव्यवस्था घटित करण्यात आली आहे आणि देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार चालविण्यात येत आहे; ती उद्दिष्टे व प्रयोजने किंवा देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांशी सुसंगत अशी इतर उद्दिष्टे किंवा प्रयोजने किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये परवानगी दिलेली प्रयोजने पार पाडण्यासाठी देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न वापरणे ;

(ङ) नियत दिनांकाच्या लगतपूर्वी देवस्थान विश्वस्तव्यवस्थेत देवतेसंबंधातील पूजा, अर्चना, धार्मिक विधी किंवा श्रद्धा ज्या स्वरूपात, शुचिर्भूततेने किंवा ज्या रीतीने पार पाडण्यात येत होत्या त्या स्वरूपात, शुचिर्भूततेत किंवा त्या रीतीमध्ये कोणताही खंड न पडता, कोणत्याही आडकाठीशिवाय किंवा कोणत्याही प्रकारे त्यात काटछाट न करता, मंदिरातील नित्य किंवा दैनंदिन किंवा नियतकालिक किंवा सर्वसाधारण किंवा विशेष पूजाअर्चा, योग्य व उचितरीत्या चालू राहतील व पार पाडल्या जातील याची सुनिश्चिती करणे; शक्य असेल तेथवर, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेतील देवतांचे दर्शन, किंवा प्रार्थना किंवा पूजा, इत्यादी भक्तगणांना उपलब्ध होत आहेत याची सुनिश्चिती करण्याबाबत विशेष दक्षता घेणे ; मंदिराच्या अधिक चांगल्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने मंदिरातील कोणतीही सेवा किंवा नोकरी करण्यासाठी समिती निर्धारित करील असे पारिश्रमिक प्रदान केल्यावर व अशा अटी व शर्तींना अधीन राहून, व्यक्ती किंवा व्यक्तींची नेमणूक करणे ;

(च) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या योजनांचा विकास करण्याच्या व त्या पूर्ण करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असलेली जमीन किंवा इमारती संपादित करणे किंवा त्या खरेदी करणे आणि विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडणे :

परंतु, कोणतीही जमीन किंवा इमारत संपादित करण्यापूर्वी किंवा खरेदी करण्यापूर्वी समिती, शासकीय मान्यताप्राप्त मूल्यनिर्धारकाकडून प्रमाणपत्र प्राप्त करील;

(छ) श्री रामाच्या वाचन साहित्याची ग्रंथालये विस्तारित करणे ;

(ज) इतर कोणत्याही व्यक्तींना वगळून देवस्थान विश्वस्तव्यवस्थेतील किंवा तिच्या प्रसीमेतील दक्षिणा, भोग, देणगी, वर्गणी यांसह एकतर रोख किंवा वस्तू स्वरूपात किंवा तत्सम स्वरूपात दररोज प्राप्त होणाऱ्या अर्पणवस्तू गोळा करणे आणि अशाप्रकारे गोळा केलेले सर्व मौल्यवान रोखे, दागदागिने, आभूषणे व इतर सर्व अर्पणवस्तू सुरक्षित ठेवल्याची सुनिश्चिती करणे :

परंतु, दानपेटी, हुंडी यामध्ये किंवा अन्यथा प्राप्त झालेली रोख रक्कम, अर्पणवस्तू, सहायक धर्मादाय आयुक्त, नागपूर किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत मोजण्यात येईल; आणि वस्तूंच्या स्वरूपात अर्पणवस्तू प्राप्त झाल्या असल्यास, समिती शासकीय मान्यताप्राप्त मूल्यनिर्धारकाद्वारे तिचे मूल्यनिर्धारण करून घेण्याची व्यवस्था करील ;

(झ) मंदिर विश्वस्तव्यवस्थेबाबत अशाप्रकारे प्राप्त झालेली रोख रक्कम, अर्पणवस्तू, त्याच्या नियंत्रणाधीन असलेल्या विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा झाल्या आहेत आणि अशाप्रकारे वस्तूंच्या स्वरूपात प्राप्त झालेल्या अर्पणवस्तू विकण्यात आल्यास, त्यापासून मिळालेले उत्पन्न, प्राप्त करणे;

(ञ) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचे व कामकाजाचे योग्य व कार्यक्षमरीत्या व्यवस्थापन, परिरक्षण व प्रशासन करण्याच्या प्रयोजनार्थ सर्वसाधारणपणे अनुषंगिक, अनुकूल किंवा आवश्यक असतील अशा सर्व कृती करणे आणि त्याच्या सेवेकऱ्यांमार्फत सेवा पुरविण्यासाठी समिती वेळोवेळी निर्धारित करील अशी फी आकारणे.

(२) (क) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे निहित केलेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाची लेखी पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज, एका वर्षाहून अधिक कालावधीसाठी पट्ट्याने देता येणार नाही, गहाण ठेवता किंवा विकता किंवा अन्यथा, अन्यसंक्रमित करता येणार नाही;

(ख) जिचे मूल्य पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक असेल असे देवस्थान विश्वस्तव्यवस्थकडे निहित असलेले कोणतेही दागदागिने, आभूषणे किंवा इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाची लेखी पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज, विकता किंवा तारण ठेवता किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करता येणार नाही;

(ग) समितीला, राज्य शासनाची लेखी पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज, कोणत्याही व्यक्ती किंवा पक्षकाराकडून, पैसा कर्जाऊ घेण्याचा अधिकार नसेल;

(घ) राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेस अधीन राहून, समितीला अन्यथा या अधिनियमाअन्वये विनिर्दिष्टपणे तरतूद केली असल्याखेरीज, परंतु या अधिनियमाखालील तिची कर्तव्ये व कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे सर्व अधिकार असतील.

लायसन देण्याचा समितीचा अधिकार.

**१६.** (१) फुलांची, प्रसादाची, पुस्तकांची व इतर साहित्य, चित्रे व समितीने मान्यता दिलेली इतर कोणतीही सामग्री विकण्यास किंवा देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या आवारामध्ये व प्रसीमेमध्ये मोटार गाड्या व इतर वाहने, सायकली, पादत्राणे, छत्र्या किंवा इतर वैयक्तिक वस्तू याची काळजी घेण्यास इच्छुक असणारी कोणतीही व्यक्ती, उपविधींद्वारे तरतूद करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीमध्ये लायसन देण्यासाठी किंवा त्याचे नवीकरण करण्यासाठी समितीकडे अर्ज करील.

(२) अशा प्रत्येक अर्जासोबत समिती उपविधींद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशी फी भरलेली असेल.

(३) समितीस, लायसन देता येईल किंवा त्याचे नवीकरण करता येईल किंवा लेखी कारणे नोंदवून लायसन देण्यास किंवा नवीकरण करण्यास नकार देता येईल.

(४) या कलमामध्ये देण्यात आलेली किंवा नवीकरण करण्यात आलेली सर्व लायसने, या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या व उप-विधींच्या तरतुदींच्या अधीन असतील.

लायसन रद्द करण्याचा किंवा निलंबित करण्याचा अधिकार.

**१७.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, समितीला,—

(क) बुद्धिपुरस्सर दुर्व्यपदेशन किंवा कपट करून लायसन मिळविण्यात आले असल्यास ;

(ख) लायसनधारकाने किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही सेवकाने किंवा कोणत्याही व्यक्तीने, दिलेल्या किंवा ध्वनित केलेल्या परवानगीने लायसनच्या कोणत्याही अटींचे किंवा शर्तीचे उल्लंघन केल्यास;

(ग) लायसनधारक नादार झाल्यास ; किंवा

(घ) लायसनधारकास नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाबाबत दोषी ठरवले असल्यास,

कारणे लेखी नमूद करून लायसन निलंबित किंवा रद्द करता येईल.

(२) अशा लायसनधारकास लायसनचे असे निलंबन किंवा ते रद्द करणे याबाबत कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज या कलमामध्ये लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात येणार नाही.

प्रकरण पाच

## कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी

**कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती.**

**१८.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांमधून कार्यकारी अधिकारी म्हणून एका व्यक्तीची नियुक्ती करील. तो, याबाबत देण्यात आलेल्या आदेशाद्वारे राज्य शासनाने यापूर्वी त्याचा पदावधी निर्धारित केला असल्याखेरीज, त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सर्वसाधारणपणे तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील.

(२) आजारपण किंवा रजा किंवा इतर कोणत्याही कारणामुळे कार्यकारी अधिकाऱ्याचे पद तात्पुरते रिक्त झाल्यास, राज्य शासन, कार्यकारी अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीच्या कालावधीकरिता, उप जिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या अधिकाऱ्यांमधून एका अधिकाऱ्याची नियुक्ती करून रिक्त पद भरील.

(३) तो, व्यवस्थापन समितीचा पदसिद्ध सचिव असेल.

(४) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांची राज्य शासनाने यथोचितरीत्या मान्यता दिलेल्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर नियुक्ती करण्यात येईल.

(५) कार्यकारी अधिकारी, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर किंवा यथास्थिति, नियत दिनांकानंतर, अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची कर्तव्ये, पदनाम व दर्जा आणि त्यांना देय असणारे वेतन व भत्ते किंवा मानधन यासंबंधातील तपशील असलेली एक अनुसूची तयार करील आणि ती व्यवस्थापन समितीमार्फत मंजुरीसाठी राज्य शासनाला सादर करील. अशी अनुसूची राज्य शासनाची मान्यता मिळाल्यावर अंमलात येईल. अशा अनुसूचीमध्ये राज्य शासनाची मंजुरी घेतल्याशिवाय कोणताही बदल करण्यात येणार नाही :

परंतु, ज्याला दरमहा एक हजारपेक्षा अधिक वेतन दिले जाईल किंवा द्यावे लागेल अशा अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्यांची नियुक्ती राज्य शासनाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय समितीकडून करण्यात येणार नाही.

(६) समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च व्यवस्थापन निधीतून देण्यात येईल.

**कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये.**

**१९.** (१) कार्यकारी अधिकारी, समितीच्या अधीक्षण, निदेशन व नियंत्रण यांच्या अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार आणि त्याखाली केलेले नियम, विनियम आणि उपविधि यांनुसार तिच्या निर्णयाचे व आदेशांचे पालन करील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कार्यकारी अधिकारी हा देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचे सर्व अभिलेख व मालमत्ता याची अभिरक्षा करण्यास जबाबदार असेल आणि देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत जमा होणाऱ्या अर्पणवस्तू, दक्षिणा, भोग किंवा भेटवस्तू किंवा यांसारखे तत्सम वस्तू-मग त्या रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात असोत, गोळा करण्याची योग्य ती व्यवस्था करील आणि कार्यकारी अधिकाऱ्यास, पुढील अधिकार असतील :-

(क) समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(ख) समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे निलंबन समितीकडे प्रस्तावित करणे;

(ग) एका वेळेस एका वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी सर्वसाधारणपणे पट्ट्याने दिल्या जातात अशा जमिनी व इमारती पट्ट्याने देणे :

(घ) ज्या कामांची किंवा पुरवठ्यांची रक्कम किंवा मूल्य एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तेव्हा अशा कामांच्या किंवा पुरवठ्यांच्या निविदा मागविणे ;

(ङ) समितीच्या कर्मचाऱ्यांमधील विवादांवर निर्णय देणे ;

(च) नाशवंत अर्पणवस्तूची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावणे आणि त्यातून आलेले उत्पन्न विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे;

(छ) भक्तगणांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक असलेल्या तातडीच्या दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे ;

(ज) समितीने किंवा विनियमांन्वये जे करण्याचे अधिकार त्यास प्रदान केले आहेत अशी लायसने देणे यांसह इतर सर्व कृती व गोष्टी करणे :

परंतु, खंड (क), (ख) व (ग) खालील अधिकारांचा वापर हा, याबाबत समितीने एकतर सर्वसाधारणपणे किंवा विशेषरीत्या दिलेल्या, कोणत्याही निदेशांच्या अधीन राहून करण्यात येईल.

(३) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी हे, समितीने किंवा कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा वेळोवेळी करण्यात आलेल्या विनियमांन्वये नेमून देण्यात येतील असे अधिकार वापरतील आणि अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडतील.

कार्यकारी अधिकाऱ्याचे आकस्मिक अधिकार.

**२०.** क्रमवर्ती सभेमध्ये व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मंजुरी घेण्याच्या अधीन राहून, कार्यकारी अधिकाऱ्यास, आणीबाणीच्या परिस्थितीत त्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये ज्याची तरतूद केलेली नाही अशा तीन लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या खर्चाचा समावेश असणाऱ्या आणि देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचे जतन करण्यासाठी किंवा देवस्थानात दर्शनासाठी येणाऱ्या यात्रेकरूंच्या सेवेसाठी किंवा सुरक्षेसाठी त्याच्या मते जे तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल, असे कोणतेही काम पार पाडण्याचे किंवा कोणतीही कृती करण्याचे निदेश देता येतील आणि तसेच, त्यास, असे काम पार पाडण्यासाठी किंवा अशी कृती करण्यासाठी तीन लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल, इतका खर्च विश्वस्तव्यवस्था निधीमधून प्रदान करण्याचे देखील निदेश देता येतील.

कार्यकारी अधिकारी, इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

**२१.** (१) कार्यकारी अधिकारी हा राज्य शासनाचा सेवक असेल, परंतु तो त्याचे वेतन व भत्ते थेट व्यवस्थापन निधीतून घेईल आणि समितीकडील प्रतिनियुक्तीवरील त्याच्या सेवेच्या शर्ती ह्या राज्य शासनाद्वारे निर्धारित करण्यात येतील, अशा असतील.

(२) समितीचे इतर अधिकारी, सेवक व कर्मचारी यांच्या सेवेच्या, अर्हतेच्या, सेवाप्रवेश पद्धतीच्या, त्यांची कर्तव्ये व कार्ये, वेतन, भत्ते, मानधन, शिस्त व वर्तणूक यांच्या अटी व शर्ती ह्या, राज्य शासनाच्या मान्यतेने समितीद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा आणि व्यवहार्य असतील त्याप्रमाणे असतील परंतु, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, त्या, विद्यमान सेवाशर्तीपेक्षा कमी दर्जाच्या नसतील. त्यांचे वेतन व भत्ते हे व्यवस्थापन निधीतून प्रदान करण्यात येतील.

(३) कार्यकारी अधिकाऱ्याला देय असलेले निवृत्तिवेतन, रजा व भत्ते (व्यवस्थापन निधीतून काढण्यात आलेल्या रकमेव्यतिरिक्त) यासाठी राज्य शासन निर्धारित करील असा खर्च किंवा अशी रक्कम दरवर्षी व्यवस्थापन निधीमधून राज्य शासनाला प्रदान करण्यात येईल.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी मंदिर विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे.

**२२.** नियत दिनांकाच्या लगतपूर्वी आणि पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या कारभारासंबंधात सेवा करीत असेल अशी प्रत्येक व्यक्ती, नियत दिनांकांच्या लगतपूर्वी तिला जे वेतन आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती लागू होत्या त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर नियत दिनांकापासून, समितीच्या देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कारभाराशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त करण्यात आल्याचे मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रीतीने समितीकडून बदल करण्यात येणार नाहीत आणि अशा व्यक्तीला राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा समितीकडून करण्यात आलेल्या विनियमांनुसार राज्य शासनाच्या मंजुरीने, अशा कोणत्याही व्यक्तींची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारांवर कोणताही परिणाम होणार नाही.

समितीने शिक्षा देणे.

**२३.** या अधिनियमाच्या तरतुदींना आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांना व विनियमांना अधीन राहून, समितीस देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा विश्वासघात, कार्यातील अक्षमता, कायदेशीर आदेशाची अवज्ञा किंवा, कामावर दुर्लक्ष करणे किंवा कामावर बुद्धीपुरस्सर अनुपस्थित राहणे, गैरवर्तणूक किंवा मंदिर विश्वस्तव्यवस्थेच्या शिस्तीला किंवा प्रतिष्ठेला कमीपणा आणणारे गैरशिस्तीचे आचरण किंवा वर्तन याबद्दल किंवा इतर कोणत्याही पुरेशा कारणाबद्दल खालीलपैकी कोणतीही शिक्षा लादता येईल :-

(क) सेवेतून काढून टाकणे ;

(ख) निष्काळजीपणामुळे किंवा आदेशभंग केल्यामुळे किंवा गैरशिस्तीचे आचरण किंवा गैरवर्तन केल्यामुळे देवस्थानास झालेल्या संपूर्ण आर्थिक हानीची किंवा त्याच्या काही भागाची वित्तलब्धीमधून किंवा वेतनेतर प्राप्तीमधून वसुली करणे ;

(ग) राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही किरकोळ शिक्षा करणे.

अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती.

**२४.** कोणतीही व्यक्ती, -

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी तयार केलेली कोणतीही योजना, करण्यात आलेला करार किंवा कोणत्याही न्यायालयाने, न्यायाधिकरणाने किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाने दिलेला कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यानुसार ;

(दोन) कोणत्याही रुढी व प्रथा यानुसार ; किंवा

(तीन) शेवटच्या पदधारकाच्या निकटचा उत्तराधिकारी आहे, या तत्त्वानुसार

अशा नियुक्तीसाठी हक्कदार आहे केवळ एवढ्याच कारणावरून, कोणत्याही पदावरील किंवा रिक्त पदावरील नियुक्तीसाठी तिचा, विचार करण्यात येणार नाही.

प्रकरण सहा

## देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा निधी

विश्वस्तव्यवस्था निधी.

**२५.** (१) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे “श्री राम मंदिर देवस्थान विश्वस्तव्यवस्था निधी” या नावाने संबोधला जाणारा स्वतःचा निधी असेल आणि तो निधी श्री राम यांच्या नावाने निहित असेल.

(२) पुढील रकमा ह्या विश्वस्तव्यवस्था निधीचा भाग होतील किंवा त्या विश्वस्तव्यवस्था निधीमध्ये भरण्यात येतील,—

(क) कलम ३ च्या तरतुदींच्या आधारे देवतेच्या नावाने निहित होणारा सर्व निधी;

(ख) देवतेला भेटवस्तू, दाने किंवा देणग्या या रूपाने मिळालेल्या किंवा पूजा आकाराच्या

स्वरूपातील, किंवा वस्तूरूपाने मिळालेल्या वस्तूंच्या लिलावाद्वारे केलेल्या विक्रीचे उत्पन्न म्हणून मिळालेल्या सर्व रकमा ;

(ग) विश्वस्तव्यवस्थेला स्थावर व जंगम मालमत्तेपासून मिळालेले उत्पन्न आणि अशा कोणत्याही मालमत्तेच्या विक्रीपासून, भाडेपट्ट्यापासून किंवा इतर हस्तांतरणापासून किंवा गहाणापासून मिळालेले उत्पन्न ;

(घ) शासनाने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने, विश्वस्तव्यवस्थेने किंवा इतर संस्थेने किंवा पक्षाने किंवा व्यक्तीने, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेला दिलेली कोणतीही अंशदाने किंवा अनुदाने;

(ङ) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेला येणे असलेल्या आणि समितीने वसूल केलेल्या कोणत्याही रकमा;

(च) समितीने कर्जाऊ घेतलेली कोणतीही रक्कम ;

(छ) या अधिनियमान्वये समितीने वसूल केलेली कोणतीही फी, दंड व शास्ती, कोणतीही असल्यास, आणि वसूल केलेल्या सर्व रकमा; आणि

(ज) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेकरिता किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने समितीने किंवा तिच्या सदस्याने किंवा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने स्वीकारलेली किंवा गोळा केलेली लायसन फी आणि पट्टा, भाडे यांसह इतर सर्व रकमा.

१९३४ चा २.

(३) विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा आणि इतर मौल्यवान वस्तू, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेत जमा करण्यात येतील किंवा त्या ठेवण्यात येतील किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, याच्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आणि राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा मार्गदर्शक सूचनांनुसार "सार्वजनिक रोख्यांमध्ये" गुंतवण्यात यातील.

(४) समितीने याबाबतीत प्राधिकृत केला असेल अशा, व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्याकडून किंवा सदस्याकडून आणि समितीच्या अधिकाऱ्याकडून, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, विश्वस्तव्यवस्था निधीचा व्यवहार करण्यात येईल.

२०२५ चा ३०.

विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग.

**२६.** (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, २०२५ याच्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात येईल अथवा तो खर्च करण्यात येईल :—

(क) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेची व तिच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे ;

(ख) देवस्थानातील धार्मिक पूजा व समारंभ पार पाडण्यासाठी सेवकांना प्रशिक्षण देणे ;

(ग) रूढी व प्रथांनुसार, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेतील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व ते पार पाडणे ;

(घ) देवतेच्या दर्शनासाठी व देवस्थान विश्वस्तव्यवस्थेत कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ पार पाडण्यासाठी येणाऱ्या भक्तगणांना सोयी व सुविधा पुरविणे ;

(ङ) भक्तगणांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालवणे ;

(च) देवतेच्या शिकवणीचा किंवा कोणत्याही हिंदू धार्मिक संस्थेतील धार्मिक तत्त्वांचा आणि धार्मिक शिकवण, संशोधन, कौशल्य विकास व संस्कृतिक कार्य यांचा प्रचार करणे ;

(छ) शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, प्रशिक्षण संस्था, संशोधन संस्था, आणि इतर शैक्षणिक संस्था स्थापन करणे, चालविणे, त्यांचे प्रशासन करणे, त्यांना मदत करणे किंवा सहाय्य करणे ;

(ज) समितीने कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमांची परतफेड करणे ;

(झ) कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाने किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमा प्रदान करणे;

(ञ) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये देवस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रक्कम यांचे प्रदान करणे ;

(ट) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे किंवा स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे ;

(ठ) भक्तगणांच्या निवासासाठी व वापरासाठी विश्रामगृहे, धर्मशाळा किंवा शयनशाळा बांधणे व त्यांची देखभाल करणे;

(ड) रुग्णालये दवाखाने, वैद्यकीय महाविद्यालये, परिचर्या शाळा, आरोग्य केंद्रे, रोग निदान केंद्रे, फिरते वैद्यकीय युनिट, आणि इतर आरोग्य सेवा संस्था स्थापन करणे, चालविणे, त्यांचे प्रशासन करणे, त्यांना मदत करणे, किंवा सहाय्य करणे, आणि भक्तांसाठी आणि सामान्य जनतेसाठी वैद्यकीय मदत व सार्वजनिक आरोग्य सेवा पुरवणे ; आणि

(ढ) कलम १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये आणि अधिकार पार पाडणे.

व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग.

**२७.** (१) व्यवस्थापन निधी नावाने संबोधला जाणारा एक स्वतंत्र निधी घटित करण्यात येईल व तो समितीकडे निहित असेल आणि तो समितीच्या नियंत्रणाखाली असेल.

(२) व्यवस्थापन निधीत कोणतीही शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास ती विचारात घेऊन समितीकडून, राज्य शासनाच्या मान्यतेने निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, त्या विश्वस्तव्यवस्थेच्या मागील शेवटच्या वर्षाच्या अदमासे एकूण वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम दरवर्षी, या निधीत जमा खाती ठेवण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटेल अशा, कोणत्याही वेळी, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दलचे निदेश देता येतील.

(३) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, व्यवस्थापन निधीचा, पुढील प्रयोजनासाठी उपयोग करण्यात येईल, -

(क) समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष व समितीचे इतर सदस्य यांना प्रवास व दैनिक भत्ते देणे;

(ख) समितीचा कार्यकारी अधिकारी, इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि देय असलेल्या इतर रकमा देणे ;

(ग) या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना समितीने किंवा कोणत्याही पदाधिकाऱ्याने किंवा सदस्याने किंवा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

(४) कलम २५ चे पोट-कलम (४) अन्वये विश्वस्तव्यवस्था निधी ज्या रीतीने उपयोगात आणला जातो त्याच रीतीने व्यवस्थापन निधी उपयोगात आणण्यात येईल.

रोख किंवा वस्तुस्वरूपात प्राप्त झालेल्या अर्पण वस्तू.

**२८.** समितीस, देवस्थानात दर्शनास येणारे यात्रेकरू व भक्तगण यांच्याकडून अर्पणवस्तू ठेवण्यासाठी, तिला योग्य वाटेल अशा, देवस्थानाच्या प्रसीमेतील एका किंवा अनेक ठिकाणी हुंडी किंवा दान पेटी यांसारखे एक किंवा अधिक दानपात्रे ठेवता येतील.

प्रकरण सात

## अर्थसंकल्प, लेखा व लेखापरीक्षा

कार्यकारी अधिकाऱ्याने राज्य शासनास अर्थसंकल्प सादर करणे.

**२९.** (१) कार्यकारी अधिकारी, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या प्रारंभापूर्वी किमान एक महिना आधी देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या जमा आणि खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज विहित करण्यात आलेल्या रीतीने व अशा नमुन्यात तयार करील आणि ते समितीपुढे ठेवील. समिती, तिला योग्य वाटतील अशा फेरबदलांसह किंवा फेरबदलाविना त्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देईल.

(२) अशा प्रत्येक अंदाजपत्रकात पुढील बाबींसाठी पुरेशी तरतूद असेल, -

(क) कोणत्याही रूढिगत खर्चासह खर्चाचे प्रमाण ;

(ख) विश्वस्तव्यवस्थेवर किंवा धार्मिक संस्थेवर बंधनकारक असलेली सर्व देय दायित्वे ;

(ग) या अधिनियमाच्या तरतुदीद्वारे किंवा तद्न्वये किंवा तरतूद केल्याप्रमाणे किंवा प्राधिकृत केल्याप्रमाणे देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या उद्देशाशी सुसंगत इतर विश्वस्तव्यवस्थेला किंवा धार्मिक संस्थांना किंवा रुग्णांना देणग्या देणे यांसह धार्मिक, शैक्षणिक, धर्मादाय प्रयोजनांवरील खर्च ;

(घ) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा तत्त्वानुसार धार्मिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी व त्याचा प्रसार करण्यासाठीचा खर्च ;

(ङ) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या इमारतींचे बांधकाम, दुरुस्ती व नूतनीकरण आणि मालमत्ता व मत्तांचे जतन व संरक्षण यांवरील खर्च; आणि

(च) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या प्रशासनासाठी समितीने किंवा कार्यकारी अधिकाऱ्याने केलेल्या खर्चाची रक्कम.

**लेखे.**

**३०.** (१) समिती प्रत्येक वित्तीय वर्षासाठीच्या सर्व जमा आणि संवितरित रकमांचे नियमित लेखे ठेवील आणि त्या लेख्यांमध्ये विहित करण्यात येईल असा सर्व तपशील अंतर्भूत असेल.

(२) जेव्हा राज्य शासनास, -

(क) समिती ही, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, सर्व जमा व संवितरित रकमांचे नियमित लेखे ठेवीत नाही ; किंवा

(ख) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेसंबंधातील खर्च अंदाजपत्रकानुसार केला जात नाही; किंवा

(ग) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती सुनिश्चित करणे आवश्यक झाले आहे,

असे सकारण वाटेल तेव्हा, राज्य शासनास समितीला पुढील निदेश देता येतील, ते असे,-

(एक) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेची विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीच्या संबंधातील खरे व लेखापरीक्षित लेखे सादर करणे; किंवा

(दोन) जेव्हा लेख्यांची वार्षिक लेखापरीक्षा केली जात नसेल त्या बाबतीत कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधी संबंधातील लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेणे.

**लेखापरीक्षा.**

**३१.** (१) याबाबतीत केलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीनुसार समितीद्वारे वार्षिक लेखापरीक्षा करण्यात येईल किंवा लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करण्यात येईल आणि अशा नियमांमध्ये लेखापरीक्षकांची नियुक्ती व विश्वस्तव्यवस्था निधीतून अशा लेखापरीक्षकास प्रदान करण्यात येईल असे पारिश्रमिक यासाठीच्या तरतुदींचा देखील अंतर्भाव असेल.

(२) या अधिनियमान्वये कोणतीही लेखापरीक्षा करणाऱ्या प्रत्येक लेखापरीक्षकास, समितीच्या ताब्यातील किंवा नियंत्रणाधीन असलेले लेखे व सर्व पुस्तके, प्रमाणके, इतर दस्तऐवज व अभिलेख पाहता येतील. समिती व कार्यकारी अधिकारी अशा लेखापरीक्षकाला अशी सर्व माहिती पाहण्याची व्यवस्था पुरवील.

(३) लेखापरीक्षक, लेखापरीक्षित केलेले लेखे, त्याच्या अहवालासह समितीला सादर करील.

## प्रकरण आठ

## नियंत्रण

**राज्य शासनाचा अहवाल, दस्तऐवज, इत्यादी मागविण्याचा अधिकार.**

**३२.** (१) राज्य शासनास, समितीला, तिच्या अधिकाराच्या किंवा कर्तव्याच्या संबंधात किंवा देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या प्रशासनाच्या प्रकरणात आणि त्यास सहाय्यभूत किंवा अनुषंगिक असलेल्या कोणत्याही प्रकरणात निदेश देण्याचा, अनुसरावयाच्या धोरणात्मक बाबींच्या संबंधात आणि विशेषतः शिस्तपालन आणि उत्सवादरम्यान किंवा देवस्थानाच्या संबंधात सुव्यवस्था राखण्याच्या प्रयोजनार्थ करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीसाठी सर्वसाधारण निदेश देता येतील.

(२) राज्य शासनास किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास स्वाधिकारे किंवा देवस्थानाशी हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून देवस्थान विश्वस्तव्यवस्था यथोचितरीत्या चालवण्यात येत आहे आणि प्रशासन करण्यात येत आहे आणि विश्वस्तव्यवस्था निधी ज्या प्रयोजनासाठी घटित केला आहे त्या प्रयोजनासाठी त्याचे विनियोजन योग्यरीत्या होत आहे किंवा कसे, याबाबत त्याची खात्री पटण्यासाठी आवश्यकतेनुसार देवस्थान विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित अशी माहिती, लेखे, अहवाल किंवा इतर दस्तऐवज किंवा प्रती किंवा त्याचा उतारा मागवता येईल आणि अशी मागणी केल्यावर उक्त देवस्थान विश्वस्तव्यवस्था माहिती, लेखे, अहवाल किंवा इतर दस्तऐवज किंवा प्रती किंवा त्याचा उतारा तात्काळ राज्य शासनास किंवा, यथास्थिति, अशा प्राधिकृत अधिकाऱ्यास देईल.

शासनाद्वारे निरीक्षण.

**३३.** राज्य शासनास, मंदिराशी संबंधित कोणतीही जंगम व स्थावर मालमत्ता, अभिलेख, पत्रव्यवहार, योजना, लेखे व इतर दस्तऐवज यांचे निरीक्षण करण्यासाठी आवश्यक वाटेल त्या त्या वेळी उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती करता येईल, आणि तद्नंतर समिती, तिचे अधिकारी व कर्मचारी हे, निरीक्षणासाठी अशा अधिकाऱ्यांना सर्व सुविधा देण्यासाठी बांधील असतील.

समितीचा कोणताही ठराव किंवा आदेश, इत्यादीस स्थगिती देण्याचा किंवा तो रद्द करण्याचा शासनाचा अधिकार.

**३४.** (१) राज्य शासनाच्या मते, समितीच्या ज्या कोणत्याही ठरावाच्या, निर्णयाच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीमुळे, किंवा या अधिनियमाद्वारे किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्या अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचे उल्लंघन करून किंवा त्यांचा अवाजवी वापर करून जे कार्य समिती करण्याच्या बेतात असेल किंवा ते तिच्याकडून किंवा तिच्यावतीने करावयाचे असेल किंवा केले जात असेल असे कोणतेही कार्य करण्यामुळे, विश्वस्तव्यवस्था निधीचा किंवा व्यवस्थापन निधीचा दुरूपयोग किंवा गैरवापर होण्याची शक्यता असेल किंवा त्यामुळे लोकांना क्षती पोहोचण्याची किंवा त्रास होण्याची शक्यता असेल किंवा ते कार्य लोकहिताविरूद्ध असेल किंवा त्यामुळे शांततेचा भंग होण्याची शक्यता असेल किंवा ते कार्य बेकायदेशीर असेल तर, शासनास लेखी आदेशाद्वारे त्यात विनिर्दिष्ट केलेला असेल अशा कालावधीकरिता, अशा ठरावाची किंवा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल किंवा तो ठराव किंवा आदेश रद्द करता येईल, किंवा असे कोणतेही कार्य करण्यास प्रतिबंध करता येईल. जेव्हा राज्य शासन याबाबत कोणताही आदेश देईल तेव्हा ते, तो आदेश देण्याबद्दलची कारणे नमूद असलेल्या त्या आदेशाची एक प्रत अशा समितीला अग्रेषित करील.

(२) असा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत समितीस, तिला योग्य वाटल्यास, राज्य शासनाचा आदेश रद्दबातल, त्यात सुधारणा किंवा फेरबदल, का करण्यात येऊ नये, असे लेखी नमूद करून, त्याबाबत राज्य शासनाकडे लेखी निवेदन देता येईल. राज्य शासनाला विहित मुदतीमध्ये असे कोणतेही निवेदन प्राप्त न झाल्यामुळे, शासनाचा आदेश कायम झाल्यास, त्याबाबतीत समितीला कोणताही आक्षेप नाही, असे गृहीत धरण्यात येईल :

परंतु, राज्य शासन, असा आदेश देण्यापूर्वी जर समितीचे निवेदन प्राप्त झाले तर, ते विचारात घेईल.

(३) समितीकडून असे निवेदन प्राप्त झाल्यावर, राज्य शासनास, असे निवेदन प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, तो आदेश रद्द करता येईल किंवा त्या आदेशात सुधारणा किंवा फेरबदल करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा तो आदेश फेरबदलासह किंवा फेरबदलाशिवाय अंमलात असण्याचे चालू राहील असा निदेश देता येतील.

(४) समितीच्या कोणत्याही कार्यवाहीचे किंवा निर्णयाचे किंवा आदेशाचे अभिलेख पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने मागविले असतील त्याबाबतीत, पोट-कलम (१) अन्वये तिच्या अधिकारांचा वापर करून, प्रलंबित असणाऱ्या अशा कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

लोक अधिकाऱ्यांनी विवक्षित दस्तऐवजाच्या प्रती किंवा त्यातील उतारे सादर करणे.

**३५.** देवस्थान विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित कोणताही अभिलेख, नोंदवही, अहवाल किंवा इतर दस्तऐवज यांचा ताबा असणारे सर्व लोक अधिकारी, समितीस किंवा कार्यकारी अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील त्याप्रमाणे अशा प्रती किंवा त्यातील उतारे सादर करतील.

**समितीचे विसर्जन व अधिक्रमण.**

**३६.** (१) या अधिनियमांन्वये नियुक्त केलेली समिती, तिच्याकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम नाही, किंवा या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली केलेल्या नियमांद्वारे तिच्याकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यात ती सातत्याने कसूर करीत आहे किंवा तिची मालमत्ता किंवा तिचे काम, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या लेखापरीक्षातून उद्‌भवलेल्या किंवा त्याच्या कार्यालयाच्या तपासणीतून उद्‌भवलेल्या बाबींसह, कायदेशीर निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर करीत आहे किंवा तिला असलेल्या अधिकारापेक्षा ती जादा अधिकार वापरीत आहे किंवा त्यांचा गैरवापर करीत आहे, असे जर राज्य शासनाचे मत झाले असेल तर, राज्य शासनास, योग्य ती चौकशी केल्यानंतर पुरेसे वाटेल अशा कोणत्याही इतर कारणास्तव आवश्यक, किंवा इष्ट वाटल्यास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, समितीच्या पदाधिकाऱ्यांची व सदस्यांची मुदत कमी करता येईल आणि उक्त समितीचे विसर्जन करता येईल आणि अशा विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत दुसरी समिती घटित करता येईल; किंवा सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी, राज्य शासनास योग्य वाटेल त्या प्रमाणे सहा महिन्यांहून अधिक नसेल अशा कालावधीसाठी अशी अधिसूचना काढून त्याद्वारे उक्त समितीचे अधिक्रमण करता येईल, आणि ज्या कारणामुळे त्या समितीचे विसर्जन किंवा अधिक्रमण करण्यात आले आहे ती कारणे त्या समितीला लेखी स्वरुपात कळविता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये घटित केलेल्या समितीची मुदत ती, ज्या समितीच्या ऐवजी ती घटित केलेली असेल त्या समितीचा जितका कालावधी शिल्लक असेल तितक्या उर्वरित कालावधी इतकी, किंवा पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा संपूर्ण तीन वर्षांच्या कालावधीइतकी असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये समिती विसर्जित करण्यात आली असेल किंवा तिचे अधिक्रमण करण्यात आले असेल त्याबाबतीत, राज्य शासन, यथास्थिति, दुसरी समिती घटित होईपर्यंत किंवा अधिक्रमणाचा कालावधी संपेपर्यंत, समितीच्या या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या किंवा अशा सेवेमधून निवृत्त झालेल्या (जिल्हाधिकाऱ्यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या व्यक्तींमधून) एका व्यक्तीची विनिर्दिष्ट कालावधीसाठी प्रशासक म्हणून नेमणूक करील.

(४) राज्य शासनास, याबाबत काढलेल्या आदेशाद्वारे, या अधिनियमान्वये प्रशासक म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्तीचे पारिश्रमिक व तिच्या सेवेच्या इतर शर्ती निश्चित करता येतील. त्याचे पारिश्रमिक व भत्ते व्यवस्थापन निधीमधून देण्यात येतील.

**देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीची मालमत्ता गैररीतीने थोपवून ठेवल्याबद्दल शास्ती.**

**३७.** जी व्यक्ती,—

(क) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये ज्यांचे व्यवस्थापन व नियंत्रण विनियमित केले जाते अशा, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीची कोणतीही मालमत्ता, दस्तऐवज किंवा लेखापुस्तके, तपासणी करण्यासाठी, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून किंवा शासनाने किंवा समितीने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून स्वतःच्या ताब्यात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणात घेऊन, अशी मालमत्ता किंवा दस्तऐवज किंवा लेखापुस्तके गैररीतीने थोपवून ठेवील, किंवा त्यांची मागणी करील; किंवा

(ख) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेची कोणतीही मालमत्ता, दस्तऐवज, किंवा लेखापुस्तके गैररीतीने ताब्यात घेईल किंवा स्वतःकडे ठेवील किंवा ते बुध्दिपुरस्सर थोपवून ठेवील, किंवा ते समितीकडे किंवा या बाबतीत तिने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीकडे सादर किंवा सुपूर्द करण्यात कसूर करील; किंवा

(ग) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता, दस्तऐवज किंवा लेखापुस्तके गैररीतीने काढून घेईल, ते नष्ट किंवा विच्छिन्न करील,

अशी कोणतीही व्यक्ती, अपराध सिध्द झाल्यावर, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

प्रकरण नऊ

## विश्वस्तव्यवस्थेने नोंदवह्या तयार करणे व त्या सुस्थितीत ठेवणे

देवस्थान विश्वस्तव्यवस्थेने नोंदवह्या तयार करणे व त्या सुस्थितीत ठेवणे.

**३८.** (१) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेसाठी, समितीद्वारे वेळोवेळी करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने पुढील बाबी दर्शविणारी नोंदवही तयार करण्यात येईल व ठेवण्यात येईलः—

(क) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेची मूळ माहिती व इतिहास, आणि विद्यमान सदस्यासह पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सदस्यांची नावे आणि विश्वस्ताच्या पदाचा उत्तराधिकार किंवा त्याचे सदस्यत्व यासंबंधात कोणत्याही रूढी व परंपरा असल्यास, त्यांचा तपशील;

(ख) कोणतीही प्रशासकीय योजना, असल्यास, तिचा तपशील आणि खर्चाचे प्रमाण;

(ग) ज्या कार्यालयाकडे कोणतेही वेतन, वित्तलब्धी किंवा प्राप्ती जोडली गेली असेल त्या सर्व कार्यालयाची नावे व स्वरूप, मुदत आणि प्रत्येक प्रकरणातील सेवेच्या शर्ती;

(घ) पैसा, जडजवाहीरे, सोने, चांदी, रत्ने, पात्रे, भांडी, वस्तू आणि देवस्थान विश्वस्तव्यवस्थेची इतर जंगम मालमत्ता व त्यांचे वजन, अंतर्भूत घटक भागांचा तपशील आणि त्याचे अंदाजित मूल्य;

(ङ) स्थावर मालमत्तेचा तपशील आणि देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या सर्व इतर दान निधी आणि सर्व मागणीहक्क विलेख व इतर दस्तऐवज;

(च) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेल्या मूर्तींच्या व इतर प्रतिमांच्या घटक भागांचा, आणि रंगीत छायाचित्राचा, मग ती पूजा करण्यासाठी उद्देशित केलेली असोत किंवा मिरवणुकीसाठी नेण्यात येणारी असोत, सविस्तर तपशील;

(छ) पुरातन किंवा ऐतिहासिक अभिलेखांचा त्याच्या संक्षिप्त आशयासह तपशील.

(२) देवस्थान विश्वस्तव्यवस्थेद्वारे अशाप्रकारे प्राधिकृत केलेल्या समितीच्या सदस्याकडून किंवा समितीच्या कार्यकारी अधिकाऱ्याकडून नोंदवही तयार करण्यात येईल, ती स्वाक्षरित करण्यात येईल आणि तिची पडताळणी करण्यात येईल.

प्रकरण दहा

## संकीर्ण

विश्वस्तव्यवस्थेने किंवा समितीने केलेले किंवा विश्वस्तव्यवस्था किंवा समिती विरुद्ध केलेले दावे आणि इतर कार्यवाही.

**३९.** देवस्थान विश्वस्तव्यवस्थेने किंवा समितीने केलेल्या किंवा विश्वस्तव्यवस्थेविरुध्दच्या किंवा समितीविरुद्धच्या सर्व दाव्यांमधील आणि इतर कायदेशीर कार्यवाहीमधील, वादकथनावर कार्यकारी अधिकाऱ्याकडून स्वाक्षरी करण्यात येईल व ते सत्यापित करण्यात येईल आणि अशा दाव्यांमधील व कार्यवाहीमधील सर्व प्रक्रिया आदेशिका कार्यकारी अधिकाऱ्यावर जारी करण्यात येईल किंवा त्याच्यावर बजावण्यात येईल.

पूर्वीच्या सार्वजनिक विश्वस्त-व्यवस्थेतर्फे किंवा तिच्याविरुद्धची कायदेशीरि कार्यवाही चालू ठेवणे आणि विश्वस्तव्य-वस्थेसंबंधी निर्देशांचा अर्थ लावणे.

**४०.** (१) जेथे पूर्वीची विश्वस्तव्यवस्था किंवा तिचा कोणताही विश्वस्त किंवा तिची समिती ही, नियत दिनांकाच्या लगतपूर्वी किंवा कलम ३ अन्वये पुनर्घटित करण्यात आलेल्या देवस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे निहित कोणत्याही मालमत्तेच्या, हक्कांच्या, दायित्वाच्या या किंवा आबंधनाच्या संबंधातील कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या नावाने एक पक्षकार असेल त्या बाबतीत, उक्त पुनर्घटित देवस्थान विश्वस्तव्यवस्थेला किंवा तिच्या समितीला पूर्वीची विश्वस्तव्यवस्था किंवा तिचे विश्वस्त किंवा तिची समिती याऐवजी त्या कार्यवाहीतील पक्षकार म्हणून दाखल करण्यात आले असल्याचे किंवा, यथास्थिति, त्यातील एक पक्षकार म्हणून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार ती कार्यवाही चालू ठेवण्यात येईल.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमातील, विनियमांतील, त्याखाली काढलेल्या अधिसूचनेतील किंवा आदेशातील किंवा कोणत्याही विलेखातील किंवा इतर दस्तऐवजातील, पूर्वीची देवस्थान विश्वस्तव्यवस्था किंवा तिचे विश्वस्त किंवा तिची समिती यांबाबतच्या कोणत्याही निर्देशांचा अर्थ, नियत दिनांकास किंवा, यथास्थिति, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर, संदर्भानुसार दुसरा अन्वयार्थ लावणे आवश्यक नसेल तर, यथास्थिति, कलम ३ अन्वये पुनर्घटित केलेल्या देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा किंवा, यथास्थिति, तिच्या समितीचा तो निर्देश आहे असा लावण्यात येईल.

समितीचा वार्षिक अहवाल.

**४१.** (१) समिती देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा प्रशासकीय अहवाल, आणि त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा जमा व खर्चाचा तपशील दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षकाचा अहवाल, त्यामध्ये देणगी स्वीकारणाऱ्या संस्थांच्या (संपूर्ण पत्त्यासह) आणि देवस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून ज्या रुग्णांना आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे त्या रुग्णांच्या आणि अशा आर्थिक सहाय्याच्या रकमेच्या संबधित माहितीसह एक तपशीलवार यादी देऊन वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि असा अहवाल, यादी व माहिती राज्य शासनाला त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील.

(२) राज्य शासन पोट-कलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत ती प्राप्त झाल्यानंतर यथाशीघ्र राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहांपुढे ठेवील आणि त्या अहवालाची प्रत किंवा त्याचे कोणतेही उतारे समितीद्वारे निश्चित करण्यात आले असेल अशा शुल्क किंवा आकाराचे प्रदान केल्यावर अशा अहवालाच्या प्रतीची किंवा त्याच्या कोणत्याही उताऱ्याची मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस देवस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

समितीचे सदस्य आणि देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी लोकसेवक असणे.

२०२३ चा ४५.
१९८८ चा ४९.

**४२.** देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचे सदस्य, कार्यकारी अधिकारी आणि सर्व अधिकारी व कर्मचारी हे, भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या खंड (२८) च्या आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याच्या कलम २ च्या खंड (ग) च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यास संरक्षण.

**४३.** राज्य शासनाने किंवा त्याच्या कर्मचाऱ्याने, समितीने किंवा समितीच्या कोणत्याही सदस्याने, अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने या अधिनियमानुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमानुसार आणि विनियमानुसार सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल त्यांच्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

इतर कायदे, इत्यादीवर अधिनियम अधिभावी असणे.

**४४.** सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यामध्ये किंवा नियत दिनांकापूर्वी त्याखाली तयार करण्यात आलेल्या व्यवस्थापनच्या कोणत्याही योजनेमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायधिकरणाने, धर्मादाय आयुक्ताच्या किंवा इतर सक्षम प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात किंवा कोणत्याही रुढीत, परिपाठात किंवा संलेखात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात राहतील.

महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ च्या तरतुदी लागू नसणे.

२००० चा महा. १८.

**४५.** (१) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये पुनर्घटित केलेल्या देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेच्या संबंधात निर्माण केलेल्या कोणत्याही भाडेदारीला किंवा देवस्थान विश्वस्तव्यवस्थेने तरतूद केलेल्या कोणत्याही निवासव्यवस्थेला उक्त अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

२००० चा महा. १८.

(२) शंका निरसनासाठी, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या ज्या इमारतीला किंवा तिच्या ज्या भागाला, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ याच्या तरतुदी लागू नसतील अशा कोणत्याही इमारतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संबंधात एखाद्या

भाडेकरूने दाखल केलेला आणि कोणत्याही न्यायालयापुढे किंवा इतर प्राधिकाऱ्यापुढे प्रलंबित असलेला कोणताही दावा किंवा कार्यवाही रद्दबातल होईल आणि उक्त अधिनियमाद्वारे किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे प्रदान करण्यात आलेले सर्व हक्क आणि विशेषाधिकार हे संपुष्टात येतील आणि ते कोणत्याही प्रकारे अंमलात राहणार नाहीत.

( ३ ) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे नियत दिनांकापूर्वी, ज्या दाव्यात किंवा कार्यवाहीत दिलेल्या हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी किंवा पूर्तता करण्यात आली असेल असा कोणताही दावा किंवा कार्यवाही ही अवैध ठरेल असे मानण्यात येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**४६.** ( १ ) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

( २ ) जेव्हा नियम प्रथमच केलेले असतील ते खेरीज करून, या अधिनियमान्वये करण्यात येणारे नियम हे पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीच्या अधीन असतील :

परंतु, तातडीने कृती करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री झाली तर, त्यास या कलमाखाली करावयाचा कोणताही नियम, अधिसूचनेत त्याबाबतची कारणे नमूद केल्यानंतर, पूर्व प्रसिद्धीशिवाय करता येईल.

( ३ ) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच तो नियम अंमलात येईल किंवा मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विनियम करण्याचा अधिकार.

**४७.** (१) समितीस, या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, या अधिनियमाशी किंवा त्याखाली कोणत्याही नियमाशी विसंगत नसलेले विनियम करता येतील.

(२) समितीने केलेले कोणतेही विनियम हे राज्य शासनाकडून किंवा त्याबाबत राज्य शासनाने धर्मादाय आयुक्ताला प्राधिकृत केलेले असेल तेव्हा धर्मादाय आयुक्ताकडून फेरबदलासह किंवा फेरबदलाशिवाय पुष्टी देण्यात आल्याखेरीज, अंमलात येणार नाहीत.

(३) या कलमाखाली करण्यात आलेले सर्व विनियम हे **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द करण्यात येतील.

अडचणी दूर करणे.

**४८.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विश्‍वस्तव्यवस्था अधिनियमाच्या (१९५० चा २९) तरतुदीन्वये, रामटेक, जिल्हा नागपूर येथे स्थित असलेले "भोसला देवस्थान, रामटेक" या नावाने ओळखले जाणारे मंदिर ही, नोंदणी क्रमांक ए-५३२(एन), दिनांक ३१ जुलै, १९७१ असणारी एक सार्वजनिक विश्‍वस्तव्यवस्था आहे. उक्त देवस्थान हे श्री राम यांचे एक प्राचीन व ऐतिहासिक मंदिर असून त्याला मोठे धार्मिक महत्व आहे आणि दरवर्षी राज्यांतून व राज्याबाहेरून लाखो भक्तगण या देवस्थानाला भेट देतात. रामनवमी व कार्तिक पौर्णिमेच्या उत्सवाप्रसंगी, मोठ्या संख्येने भक्तगण देवस्थानाला भेट देतात.

**२.** सध्या, माननीय मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने यांनी दिलेल्या आदेशानुसार न्यायालय धारक म्हणून काम पाहणाऱ्या उप-विभागीय अधिकारी, रामटेक याच्या देखरेखीखाली देवस्थानाचे प्रशासन व व्यवस्थापन करण्यात येत आहे.

**३.** देवस्थानाची वाढती कार्ये आणि वाढवणारी व्याप्ती, वाढते आर्थिक व्यवहार, प्रलंबित कायदेशीर प्रकरणे आणि विद्यमान व्यवस्थापन संरचनेतील मर्यादा विचारात घेता, देवस्थानाचे सुयोग्य, पारदर्शक, उत्तरदायी आणि कार्यक्षम प्रशासन व व्यवस्थापन करण्याची सुनिश्‍चिती करण्यासाठी वैधानिक यंत्रणेची तरतूद करणे आवश्यक आहे.

देवस्थानाकडे मोठ्या प्रमाणावर जंगम व स्थावर मालमत्ता आहेत आणि म्हणून, व्यवस्थापन समिता घटित करून आणि कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी व देवस्थानाच्या व त्याच्या मालमत्तेचे योग्य प्रशासन, संरक्षण व व्यवस्थापन करण्यासाठी इतर प्रशासकीय उपाययोजना करण्यासाठी तरतूद करून राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली व देखरेखीखाली उक्त देवस्थान श्री राम मंदिर देवस्थान विश्‍वस्तव्यवस्था (रामटेक) या नावाने पुनर्घटित करण्यासाठी एक विशेष कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे, असे वाटते.

प्रस्तावित कायद्यामुळे देवस्थानाचे प्रशासन व व्यवस्थापन अधिक सुलभ होईल, प्रशासन व आर्थिक कारभारामध्ये पारदर्शकता राखणे सुनिश्‍चित होईल, देवस्थानाच्या मालमत्तेचे व हिताचे संरक्षण होईल आणि भक्तगणांना व सर्वसामान्य जनतेला अधिक उत्तम सोयीसुविधा व सेवा पुरविणे शक्य होईल.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ९ जुलै, २०२६.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.**

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत

**खंड १(२).**—या खंडान्वये, ज्या दिनांकास या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात येतील तो दिनांक, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५(२).**—या खंडान्यये, त्याच्या उप-खंड (१) अन्वये श्री राम मंदिर देवस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती घटित अध्यक्ष, उपाध्यक्ष कोषाध्यक्ष आणि इतर आठ सदस्यांपेक्षा कमी नसतील इतके सदस्य, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५(४).**—समिती यथोचितरीत्या घटित होईपर्यंत देवस्थान विश्वस्त व्यवस्थेची कार्ये पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६(१).**—या खंडान्वये, समितीच्या सदस्यास समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी किंवा त्याचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून त्याच्या कर्तव्याशी संबंधित कोणतेही कामकाज चालविण्यासाठी मानधन, प्रवास भत्ता आणि दैनिक भत्ता यांचे दर, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८(१) (ख).**—या खंडान्यये, समितीच्या सदस्यांकडून त्याच्या नियुक्तीच्या पूर्वी करण्यात यावयाच्या शपथपत्राचा नमुना, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ११.**—या खंडान्वये, समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष किया सर्व किंवा कोणत्याही सदस्यांचा पदावधी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कमी करण्याचा अधिकार, आणि नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्य यांची निर्धारित मुदतीकरिता नियुक्ती करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २३(ग).**—या खंडान्वये उक्त खंड २३ अन्वये ज्या शिक्षा देण्यात येतात अशा उप-खंड (क) आणि (ख) मध्ये नमूद केलेल्या शिक्षेव्यतिरिक्त इतर कोणत्याही किरकोळ शिक्षा, नियमांद्वारे, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २५(४).**—या खंडान्वये, उक्त खंड २५ अन्यये विश्वस्तव्यवस्था निधी सुरू करण्यासाठीची रीत आणि शर्ती, नियमांद्वारे, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २९(१).**—या खंडान्वये उक्त खंड २९ अन्वये देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या जमा आणि खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाची रीत व नमूना, नियमांद्वारे, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३०(१).**—या खंडान्वये, समितीच्या प्रत्येक वित्तीय वर्षाकरिता सर्व जमा आणि संवितरित रकमांचा नियमित लेख्यामध्ये ज्या तपशीलाचा अंतर्भाव असेल तो तपशील, नियमांद्वारे, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३१(१).**—या खंडान्वये, समितीच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याची रीत लेखापरीक्षकांची नियुक्ती आणि लेखापरीक्षकास द्यावयाचे पारिश्रमिक याच्या तरतुदी, नियमांद्वारे, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३६(१) व (२).**—या खंडान्वये, यथोचित चौकशी केल्यानंतर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्यामध्ये नमूद केलेल्या कारणांवरून समितीच्या पदाधिकाऱ्यांची आणि सदस्यांची मुदत कमी करण्याचा आणि समितीचे विसर्जन करण्याचा आणि अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीकरिता अशा विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, दूसरी समिती घटित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४६.** या खंडान्वये, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला

**खंड ४७.**—या खंडान्वये, कार्ये कर्तव्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने आणि या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम याच्याशी विसंगत नसतील, असे विनियम करण्याचा अधिकार, समितीकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४८.**—या खंडान्वये, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती अडचण दूर करण्यासाठी, **शासकीय राजपत्रात,** आदेश प्रसिद्ध करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये रामटेक, जिल्हा नागपूर येथे स्थित असलेली "भोसला देवस्थान, रामटेक" या नावाने नोंदणी केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरिता आणि श्री राम मंदिर देवस्थान, रामटेक याचे उत्तम प्रशासन व व्यवस्थापन करणे, राज्य शासनाच्या देखरेखीखाली त्याच्या मालमत्तेचे व कामकाजाचे संरक्षण व व्यवस्थापन करणे, त्याच्या धार्मिक परंपरांचे जतन करणे, भक्तगणांना अधिक उत्तम सुविधा पुरविणे यांकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुखमंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई